मी कयामतच्या दिवसी तिन प्रकारच्या लोकांच्या विरोधात उभा राहिल

हजरत अबु हुरैरा रजिअल्लाहु अनहु वर्णन करतात की प्रेषितांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम फरमाविले आहे की: <>. [صحيح] [رواه البخاري]

प्रेषितांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम माहिती दिली आहे की, साक्षात अल्लाह फरमावितो की, तिन प्रकारच्या लोकांविरोधात कयामतच्या दिवसी मी स्वतः प्रतिद्वंदी म्हणुन दावा करेन, आणी ज्याच्या विरोधात मी उभा राहिलो तर त्याला कडी सजा दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही: पहिला तो व्यक्ती जो अल्लाह चे नाव घेऊन शपथ घेतो व करार करतो मात्र त्यावर ठाम राहत नाही, तर सरळ सरळ विश्वासघातच करतो. दुसरा तो व्यक्ती जो एखाद्या आजाद माणसाला गुलाम बनवुन विकतो आणी त्याची किंमत सुद्धा हडप करतो. तिसरा तो व्यक्ती जो एखाद्या मजुराला कामावर ठेवतो, काम करून घेतो, परंतु त्याच्या मजदुरीची परतफेड करत नाही.

http://www.sunnah.global/hadeeth/mr/show/66163